# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११



नियामक मंडळाची ३२ वी बैठक दिनांक १८ फेब्रुवारी २००३

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३२ वी बैठक दि.१८.२.२००३ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३२/१

"ठराव करण्यात येतो की, ३१ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ३२/२

"ठराव करण्यात येतो की,

१. सन २००१-०२ या आर्थिक वर्षाचा रु.१३६४२.२१ कोटींचा ताळेबंद स्वीकृत करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. वित्तीय वर्ष २००१-०२ या कालावधीतील अंतर्गत लेखा परिक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन स्वीकृत करण्यात येत आहे."

ठराव क्र. ३२/३

"ठराव करण्यात येतो की,

१. वर्ष २००३-०४ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात पाणीपट्टी वसुलीचे उत्पन्न रु. १३० कोटी ऐवजी रु. २५० कोटी ठेवावे. तसेच पाणीपट्टी वसुलीसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उद्दिष्ट ठरवून देऊन पाणीपट्टी वसुलीसाठी विशेष प्रयत्न करावेत.

२. वरील (१) प्रमाणे पाणीपट्टी वसुली रु. २५० कोटी दर्शवून वर्ष २००३-०४ या आर्थिक वर्षाच्या रु. ४६८८ कोटींच्या अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत असून, हा अर्थसंकल्प मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात यावा."

ठराव क्र. ३२/४

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील ए.आय.बी.पी. कार्यक्रमांतर्गत इ.स. २००२-०३ मध्ये उपलब्ध होणाऱ्या निधीचा उपयोग शासनाने क्र. पीएलएन-२००२/५१३(७२/२००२) दि.२०.१.०३ च्या पत्राने दिलेल्या सूचनांप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत ए.आय.बी.पी. अंतर्गत समाविष्ट असलेल्या प्रकल्पांसाठीच करण्यात यावा."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

Resolution_dir_meet_32.doc

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र. ३२/५

"ठराव करण्यात येतो की, विधानसभा विनंती अर्ज समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने खडकवासला प्रकल्पांतर्गत जुना मुठा कालवा किमी १८/७०० ते किमी ८२ मधील पुणे महानगरपालिकेकडून सांडपाण्यावर प्रक्रिया करुन उपलब्ध होणाऱ्या ६.५ अब्ज घनफूट पाणी वापराच्या दृष्टीने नुतनीकरण करण्यासाठी सुमारे रु. ४३.२८ कोटी खर्चाची कामे विहीत पद्धतीचा अवलंब करुन व निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३२/६

१. "ठराव करण्यात येतो की, उच्चाधिकार समितीच्या सूचनेनुसार महामंडळाच्या कार्यक्षेतील बंद असलेल्या कामांपैकी काही कामे प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्यासाठीच्या प्रस्तावावर नियामक मंडळाच्या नंतरच्या बैठकीत चर्चा करण्यात यावी."

ठराव क्र. ३२/७

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील जी कामे निधीअभावी बंद आहेत, परंतु कंत्राटदार स्वबळावर व जोखमीवर सदर कामे सुरु करण्यास तयार आहेत, अशी कामे खालील अटींच्या अधीन राहून सुरु करण्याचे अधिकार मा. अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

१. कामापोटी देयक न मिळाल्यास कोणत्याही प्रकारचा क्लेम करणार नाही, असे कंत्राटदाराने वैधानिकदृष्ट्या नोंदणीकृत केलेले पत्र द्यावे.

२. सदर काम प्राधान्यक्रमात असावे व ज्या कामांमुळे (१) धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होणार आहे, (२) प्रकल्पाच्या सिंचनक्षमतेत वाढ होणार आहे, व (३) जी कामे धरणांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहेत, अशीच कामे सुरु करण्यात यावीत."

ठराव क्र. ३२/८

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा नदीवर बिगर सिंचनासाठी १४३ दलघमी वरुन २६५ दलघमी पाणी आरक्षित करण्यास व वाढीव बिगर सिंचन वापराच्या प्रमाणात सिंचन कपात करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३२/९

"ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाच्या कार्यकक्षेतील उपसा योजनांच्या यंत्रसामुग्री व विद्युत कामांचा पूर्ण रकमेचा विमा शासकीय विमा निधीच्या तुलनेत इतर विमा कंपन्यांचे हप्ते किफायतशीर असतील तर, इतर विमा कंपन्यांकडे उतरविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

२. महामंडळाच्या कार्यकक्षेतील उपसा सिंचन योजनांच्या कामांना निधी उपलब्धतेअभावी विलंब झाला असेल अथवा होणार असेल अशा कामांच्या निविदेतील "कंत्राटदाराने हस्तांतरण होईपर्यंत विमा हप्ते भरण्याची शर्त" कामाचा निविदेतील विहीत कालावधी समाप्त झाल्यावरही राहील व अशा कालावधीत यंत्रसामुग्रीच्या विम्याचे हप्ते कंत्राटदारांनी भरावेत व महामंडळाने त्याची प्रतिपूर्ती करावी.

३. उपसा योजनेच्या पंपिग यंत्रसामुग्री व विद्युत यंत्रसामुग्रीची सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उप अभियंता/शाखा अभियंता यांच्यावर सोपविण्यात यावी.

४. यंत्रसामुग्रीच्या सुरक्षिततेसाठी सध्याच्या आस्थापनेतून सीआरटी/सीआरपी चे कामगार नेमण्यात यावेत. तसेच या कामगारांकडून प्रकल्पाचा परिसर स्वच्छ ठेवण्याची कामे करुन घेण्यात यावीत."

ठराव क्र. ३२/१०

"ठराव करण्यात येतो की, लघु पाटबंधारे बोरपाडळे व बोरीवडे ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या लघु पाटबंधारे योजनांची कामे "बांधा, वापरा व हस्तांतर करा" या तत्वावर करण्यासाठी खाजगी संस्थांनी सुचविलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करण्यासाठी सचिव (पा) व सदस्य, सचिव (लाक्षेवि) व सदस्य, कार्यकारी संचालक व मुख्य अभियंता (महामंडळ) यांची समिती नेमण्यात येत असून या समितीने वरील प्रस्ताव अभ्यासून करारनाम्याच्या अटी व शर्तीचा मसुदा तातडीने तयार करावा व नियामक मंडळासमोर पुढील बैठकीत सादर करावा."

## आयत्या वेळचे ठराव

ठराव क्र. ३२/११

"ठराव करण्यात येतो की, पवना नदीवर राजापुरी को.प. बंधारा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बांधावा. सदर बंधारा बांधून होईपर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ६.०० दलघमी पाणी औद्योगिक वापरासाठी इंद्रायणी नदीतून वापरण्याची परवानगी तात्पुरत्या स्वरुपात देण्यात यावी."

ठराव क्र. ३२/१२

"ठराव करण्यात येतो की, आरफळ कालवा योजनेअंतर्गत खानापूर तालुक्यात कालव्याच्या कामांमुळे, महामंडळाने अधिग्रहीत केलेल्या जमिनीच्या बाहेर झालेल्या द्राक्षबागांच्या नुकसानीबाबत सानुग्रह अनुदान देण्याचा प्रस्ताव मा. आयुक्त, पुणे यांचेकडून प्राप्त झाल्यावर, तपासून शासनास खास बाब म्हणून मान्यता देण्यासाठी पाठविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र. ३२/१३

"ठराव करण्यात येतो की, इंदापूर तालुक्यातील भीमा नदीवरील १४ को. प. बंधाऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीची कामे संबंधित साखर कारखाने/संस्था यांनी करण्याबाबतचा प्रस्ताव ठराव क्र. ३२/१० नुसार नेमलेल्या समितीने अभ्यासून अटी व शर्तीबाबत शिफारस करावी व पुढील बैठकीत करारनाम्याच्या अटी व शर्तीच्या मसुद्यासह मान्यतेसाठी सादर करण्यात यावा."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

Resolution_dir_meet_32.doc